दिनांक ०९/०२/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " **माहे डिसेंबर—२०१९** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची/गुन्हे शाखा कक्ष यांची निवड करण्यात आलेली आहे.

## अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर — २०१९

| | | |
|---|---|---|
| **०१** | **गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—५** | **गु.प्र.शा., गु.अ.वि., गु.र.क्र. २१५/१९ (माहिम पो. ठाणे, गु.र. क्र. ४११/१९) कलम ३०२, २०१, १२०(ब) भादवि.** |

**—:खून करुन खूनाचा पुरावा नष्ट करणे:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— यातील फिर्यादी स.फौ. श्री. दत्तात्रय सणस, वय ५७ वर्षे हे दि. ०२/१२/१९ रोजी दिवसपाळी कर्तव्यावर माहीम—१ वाहनावर असताना दुपारी १५.३९ वाजता मगदुम शहा बाबा दर्ग्याच्या पाठीमागे समुद्र किनारी एका बॅग मध्ये मानव जातीचा पाय आहे असा संदेश नियंत्रण कक्षाकडून प्राप्त झाल्याने ते पथकासह तात्काळ सदर ठिकाणी पोहचले. मगदुमशाह बाबा दर्ग्याच्या पाठीमागे समुद्र किनारी एका सुटकेसमध्ये एक मानवी हात, एक पाय व पुरूषाचे गुप्तांग मिळाले. तसेच त्यासोबत सुटकेसमध्ये दोन शर्ट, एक पँट व एक स्वेटर मिळून आल्याने गु.र.क्र. ४११/१९, कलम ३०२, २०१ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | — | श्री दत्तात्रय दगडू सणस, वय ५७ वर्षे, (स.फौ.) |
| बळीत/मयत | — | बेनेट लेसली रिबेलो, वय ५९ वर्षे. |
| आरोपी अटक व दिनांक | — | १) विधीसंघर्षग्रस्त बालिका भाविका जितेंद्र जोगळे उर्फ आराध्या जितेंद्र पाटील उर्फ रिया बेनेट रिबेलो, वय १७ वर्षे,<br>२) विधीसंघर्षग्रस्त बालक सोमेश बापू कसबे, वय १६ वर्षे,<br>३) अलीमियाँ उमरमियाँ चाऊस, वय १९ वर्षे,<br>आरोपी क्रमांक १ व २ दिनांक ०७/१२/२०१९.<br>आरोपी क्रमांक ३ दि. १३/१२/१९. |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाचे गंभीर्य ओळखून गुन्हे शाखेच्या कक्ष—५ चे पथकाकडून जलद गतीने गुन्हयाचा समांतर तपास सुरू करण्यात आला. मिळालेल्या सुटकेस मध्ये मयताच्या अवयवांसोबत दोन शर्ट, एक पँट व एक स्वेटर मिळून आले होते. त्यापैकी एका शर्टच्या कॉलरवर “ALMO MENS WEAR’S असा टेलर मार्क आढळून आला. सदर दुकानाचा शोध घेण्यात आला. दुकानाचे मालक अफरोज अन्सारी यांनी शर्टवरील टेलरमार्क दाखविले असता, त्यांच्या दुकानात शिवलेले असल्याचे सांगितल्याने दुकानातील मागील दिड वर्षाची १०० बिल पुस्तके ताब्यात घेवुन ती तपासण्यात आली. बिल पुस्तकांचे बारकाईने निरिक्षण केले असता, एका बिल पुस्तकातील कपडयाचा नमुना सापडलेल्या शर्ट बरोबर जुळत असल्याचे आढळून आले. त्या बिलावर इसमाचे नाव ‘‘बेनेट’’ असे लिहिले होते. ‘‘बेनेट’’ नावाच्या इसमाबाबत चौकशी केली असता त्यांना सदर इसमाबाबत माहिती सांगता आली नाही.

‘‘बेनेट’’ हा गुन्हयातील मृत व्यक्ती असावा, अशी शक्यता गृहीत धरून सोशल मिडियामार्फत शोध घेण्याचा प्रयत्न केला असता, फेसबुक या सोशल मिडियावर ‘‘बेनेट रिबेलो’’ या नावाचे फेसबुक प्रोफाईल मिळून आले. नमुद फेसबुक प्रोफाईलवरील फोटोचे निरीक्षण केले असता, ‘‘बेनेट रिबेलो’’ त्यांच्या अंगावर असेलेले मरून रंगाचे हाफ स्लीव्हलेस स्वेटर हे घटनास्थळी सुटकेस मध्ये मिळून आलेल्या मरून रंगाच्या स्लीव्हलेस स्वेटरशी मिळते—जुळते असल्याचे दिसून आले. सदर फेसबुक अकाऊंटचे अधिक अवलोकन केले असता त्यामध्ये ‘‘बेनेट रिबेलो’’ याचा व्हिजिटींग कार्डचा एक फोटो

मिळून आला. त्यावर त्याचा मोबाईल क्रमांक व पत्ता नमूद असल्याचे दिसून आले. त्याच बरोबर त्यांनी फेसबुकवर इंग्रजीमध्ये सारेगामा हे शब्द लिहलेले व त्याखाली सही केलेली पोष्ट टाकली होती. पोष्टवर असलेली बेनेट रिबेलो यांची सही व "ALMO MENS WEAR'S यांच्या बिल पुस्तकात कपडे स्विकारताना केलेली सही एक सारखी असल्याचे दिसून आले. त्यामुळे या गुन्हयातील मयत हे बेनेट रिबेलो असल्याचे शक्यता बळावली.

बेनेट रिबेलो याच्याबाबत राहत्या परिसरात गोपनियारित्या चौकशी केली असता, ते घरात त्यांच्या मानलेल्या मुलीसह राहत असल्याचे तसेच आठ—दहा दिवसापासून त्यांना कोणीही पाहिले नसल्याचे समजले. बेनेट रिबेलो यांची मानलेली मुलगी भाविका जितेंद्र जोगळे उर्फ आराध्या जितेंद्र पाटील उर्फ रिया बेनेट रिबेलो, वय १७ वर्षे व तिचा प्रियकर विधीसंघर्षग्रस्त बालक सोमेश बापू कसबे, वय १६ वर्षे यांना ताब्यात घेण्यात आले असता त्यांनी बेनेट रिबेलो हे कॅनडा येथे गेल्याचे सांगीतले. परंतू केलेल्या पोलीस चौकशीमध्ये ते फार काळ टिकाव धरू शकले नाही. बेनेट रिबेलो हा आराध्या हिचा सतत लैंगिक छळ करीत होता व तिचा प्रियकर सोमेश बापू कसबे, याच्या सोबत असलेल्या प्रेमाला विरोध करीत होता. याचा राग मनात ठेवून दिनांक २६/११/२०१९ रोजी संध्याकाळी दोघांनी मिळून बेनेट यास लाकडी बांबू, लाकडी रिप व चाकुने मारून तसेच त्याच्या तोंडावर ब्लॅक हिट नावाचे मच्छर मारण्याचे औषध मारून त्याचा खुन केल्याचे कबुल केले.

सदर प्रकरणात मयत इसमाचा संपूर्ण मृतदेह मिळून आलेला नसताना तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांनी परिश्रम घेवून केवळ शर्टवरील टेलर मार्क वरून माहिती मिळविली. त्या माहितीबाबत फेसबुक या सोशल मिडियावर मयताच्या प्रोफाईलचा शोध घेवून फेसबुक प्रोफाईलवरील फोटोंमधील कपडयावरून तसेच फेसबुकच्या पोष्टवर केलेल्या स्वाक्षरीवरून त्याची ओळख पटविली. व त्यानंतर कोणतीही पुरक माहीती नसताना अतिशय गुंतागुंतीच्या गुन्हयाची कौशल्यपुर्वक फक्त ५ दिवसात उकल केली.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—५** तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पो.नि. | जगदीश साईल | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | योगेश चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | गणेश जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सुरेखा जौंजाळ | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | महेंद्र पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | महेश बंडगर | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | हिंदुराव चिंचोलकर | प्रशस्तीपत्रक |
| ८ | स.पो.उ.नि.क्र. २५०२६ | संजय कदम | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र. २९८५४ | गुरव | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. २५३९६ | मुरलीधर सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ३१४५७ | महेबुब शेख | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ३१२४९ | विलास देसाई | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. ३१२३४ | धनंजय पैंगणकर | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. २३८११ | गोविंद सोनहिवरे | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | पो.ह.क्र. २९७९९ | रविंद्र राणे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. ३१३१८ | सुजीत घाडगे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ९९००३३ | संजय वायंगणकर | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. २८६१५ | शशीकांत घोरपडे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र. ३३८३७ | अरविंद मालुसरे | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र.९६०५५१ | प्रशांत वेंगुर्लेकर | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र. ३३७१२ | प्रदिप शिरसाठ | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र. ९६०५३६ | नितेश विचारे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ना.क्र ३३३६९ | विलास वाबळे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ना.क्र. ००८७५ | रोहिदास वंजारे | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ना..क्र. ०१८७० | नितीन जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.ना.क्र. ०१—८०९ | विकास घागरे | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.ना.क्र. ९९०६०७ | हरेश कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. ०८०६८६ | सरफरोज मुलाणी | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र. ०५—००१४ | बाबासाहेब जावळे | प्रशस्तीपत्रक |
| ३० | म.पो.शि.क्र. ०९१३२९ | भावना पाटील | प्रशस्तीपत्रक |